पिण्याच्या पाण्याच्या टंचाई अंतर्गत बुलडाणा जिल्हयातील मेहकर शहर नळ पाणी पुरवठा योजनेच्या विशेष दुरुस्ती प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः टंचाई २०१८/प्र.क्र. ३० /पापु १४
जी. टी. रुग्णालय इमारत संकुल, ७ वा मजला, लोकमान्य टिळक मार्ग
मंत्रालय, मुंबई ४०० ००१
तारीख: १९ एप्रिल, २०१८

<u>वाचा -</u>

१) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग. क्रमांकः टंचाई २००८/प्र.क्र. १४९/पापु १४, दिनांक २१.०८.२००९
२) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांकः टंचाई २०१६/प्र.क्र.१४३/पापु १४, दिनांक ४.५.२०१६
३) विभागीय आयुक्त, अमरावती यांचे क्रमांक प्रासंनप/सलेअ/कावि-३८/२०१८, दिनांक १०.४.२०१८ चे पत्र
४) शासन पत्र क्रमांक : बैठक २०१७/प्र.क्र. १७०/पापु १४, दिनांक १३ एप्रिल, २०१८ (बैठकीचे इतिवृत्त)

<u>प्रस्तावना -</u>

विभागीय आयुक्त, अमरावती यांनी त्यांच्या दिनांक १०.०४.२०१८ च्या पत्रान्वये सन २०१७-१८ च्या टंचाई कालावधीसाठी पाणी टंचाई कार्यक्रमांतर्गत मेहकर शहर, जिल्हा बुलडाणा येथील नळ योजनेच्या विशेष दुरुस्तीचा रुपये २४४.३२ लाख इतक्या किंमतीचा प्रस्ताव प्रशासकीय मंजूरी मिळण्याबाबत शासनास सादर केला होता. सदर प्रस्ताव सचिव स्तरीय स्थायी समितीच्या दिनांक ११ एप्रिल, २०१८ रोजी झालेल्या बैठकीत मान्यतेसाठी विचारात घेण्यात आला होता.

मेहकर शहराची नळ पाणी पुरवठा योजना ही सन १९९९ ची असल्यामुळे पंप जीर्ण झाल्यामुळे वारंवार नादुरुस्त होत असून पंपामधून होणारा डिस्चार्ज कमी झाला आहे. तसेच मुख्य जलवाहिनी ही ए.सी.व सी. आय. पाईपची असून जीर्ण झाल्यामुळे विशेष दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने टंचाई उपाययोजनेतंर्गत १) Raw Water Pumping Machinery and Transformer sub station at Head Work Site.२) Replacement of ३५० mm dia, AC pipe with ३५० mm, D.I.K, K-७ Pipes २१०० m ३) Pure Water Pumping Machinery

४) Repairs of Raw Water Rising Main ४०० mm dia, D.I. K-९ and Gravity Main ४०० mm, D.I.K.-७ and ३०० mm dia D.I.K.- ७, व ५)Repairs of Water Treatment Plant या बाबींचा समावेश असलेला रुपये २४४.३२ लाख इतक्या किंमतीच्या प्रस्तावास एक विशेष बाब म्हणून प्रशासकीय मान्यता देण्याची विनंती शासनास केली आहे. सदर प्रस्तावातील कामाच्या अंदाजपत्रकास अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, अकोला यांनी तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे. सचिव स्तरीय स्थायी समितीच्या बैठकीत मान्यता दिल्यानुसार १) Raw Water Pumping Machinery and Transformer sub station at Head Work Site २) Replacement of ३५० mm dia, AC pipe with ३५० mm, D.I.K, K-७ Pipes २१०० m ३) Pure Water Pumping Machinery या उपांगांचा समावेश असलेल्या रुपये १,९५,४९,८५० /- (रुपये एक कोटी, पंच्याण्णव लाख, एकोणपन्नास हजार, आठशे पन्नास फक्त) इतक्या किंमतीच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

प्रस्तावनेत नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेऊन विभागीय आयुक्त, अमरावती यांनी मेहकर शहर, जिल्हा बुलडाणा येथील पाणी टंचाई अंतर्गत नळ योजना विशेष दुरुस्तीच्या उपाययोजनेत प्रस्तावित करण्यात आलेल्या कामांचा समावेश असलेल्या रु. १,९५,४९,८५० /- (रुपये एक कोटी, पंच्याण्णव लाख, एकोणपन्नास हजार, आठशे पन्नास फक्त) किंमतीच्या प्रस्तावास खालील अटींच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

१) जिल्हाधिकारी, बुलडाणा यांनी मेहकर शहरात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली असल्याचे सर्व प्रथम घोषित करावे.
२) सदर योजनेची अंमलबजावणी नगरपरिषद, मेहकर यांनी करावी.
३) सदर योजनेची कामे विहित पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येऊन करावीत. योजनेचे काम मान्यता प्राप्त किंमतीमध्येच पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी.
४) योजनेची निविदा अल्प मुदतीची (७ दिवस) काढण्यास परवानगी देण्यात येत आहे.
५) निविदा प्रक्रीया दिनांक २७ एप्रिल, २०१८ पर्यंत पूर्ण करुन कार्यारंभ आदेश देणे आवश्यक आहे. निविदा प्रक्रीया या दिनांका पर्यंत पूर्ण न झाल्यास योजनेची मान्यता रद्द समजण्यात येईल.
६) योजनेची कामे टंचाई कालावधीत पूर्ण होणे आवश्यक आहे.
७) सदर योजनेच्या एकूण रुपये १,९५,४९,८५०/- खर्चाच्या ९० % म्हणजेच रुपये १,७५,९४,८६५ /- इतके अनुदान शासनाद्वारे उपलब्ध करुन दिले जाईल. उर्वरीत रक्कम म्हणजेच योजनेच्या १० % (**मेहकर ‘ब ’नगरपरिषद असल्याने**) रक्कम रुपये १९,५४,९८५/- लोकवर्गणी म्हणून नगर परिषद, मेहेकर यांनी भरावयाची आहे. ही लोकवर्गणी जमा केल्यानंतरच योजनेच्या कामास सुरुवात करण्यात यावी.

८) सदर प्रस्तावात नमूद केलेली सर्व कामे नगर परिषद, मेहकर यांचेमार्फत करणे आवश्यक राहील.

९) योजनेची कामे मंजूर/मान्यता प्राप्त किंमतीमध्येच तातडीने पूर्ण होतील याची दक्षता घ्यावी. योजनेची किंमत वाढल्यास त्यास शासन जबाबदार राहणार नाही.

१०) विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी सदर योजनेकरिता योजनेच्या सुरुवातीस ५०% इतका निधी द्यावा व उर्वरित ५०% निधी योजना कार्यान्वित झाल्यानंतरच देण्यात यावा.

११) कोणत्याही कारणाने योजनेच्या खर्चात वाढ झाल्यास त्याकरिता शासनाकडून वाढीव अनुदान उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.

१२) योजनेचे काम मुदतीत पूर्ण होणे आवश्यक असल्याने योजनेच्या निविदा प्रक्रीयेपासून ते योजनेतून पाणीपुरवठा सुरु होईपर्यंत आठवडयाच्या प्रत्येक सोमवारी प्रगती अहवाल शासनास पाठविण्यात यावा.

२. यासाठी होणारा खर्च मागणी क्र. सी-६, २२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य, ०१-अवर्षण, १०२ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, ९१ - राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च, (९१)(०१) पिण्याच्या पाण्याचा आकस्मिक निकडीचा पुरवठा (२२४५००९३) (दत्तमत) (वेतनेत्तर) - ३१, सहाय्यक अनुदाने या लेखाशिर्षाखालील तरतूदीमधून भागविण्यात यावा व त्याखाली अंतिमत: खर्ची टाकण्यात यावा.

३. हा शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ नागरी व ग्रामीण क्षेत्रातील विहित आर्थिक व भौतिक निकषाबाहेरील तात्पुरत्या पाणी पुरवठा योजना/ उपाययोजनांना प्रशासकीय मंजूरी देण्यासाठी अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या सचिवस्तरीय स्थायी समितीच्या दिनांक ११ एप्रिल, २०१८ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४१७१४२६३२९४२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Mahesh Bhagwan Sawant

Digitally signed by Mahesh Bhagwan Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d1f670a17d77c8ddff69694de2a07b7ff855dafef954aefa82ca28bd6cc6adb6, cn=Mahesh Bhagwan Sawant
Date: 2018.04.19 17:19:05 +05'30'

(महेश सावंत)
उप सचिव , महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई

२. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर
३. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव, (म.व पु.) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
५. सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
७. विभागीय आयुक्त, अमरावती
८. जिल्हाधिकारी, बुलडाणा
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलडाणा
१०. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, बुलडाणा
११. मुख्याधिकारी, नगर परिषद, मेहकर, जि. बुलडाणा
१२. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
१३. उप सचिव (पापु १४) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
१४. पापु १४ (निवडनस्ती)